# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 27/12/2022 (मंगळवार) दुपार

---

## घरफोडी

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत एन्क्लेव अपार्टमेन्ट फलॅट नं. १०३ जि. नागपुर येथे दिनांक २६/१२/२०२२ चे १५.०० वा. ते १९.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– गणेश केशवराव बिकोडे, वय ३३ वर्ष, रा. पुष्कराज ए पुश्कराज एन्क्लेव अपार्टमेन्ट प्लॉट नं.२८ सेक्टर ए सिडको बुटीबोरी फ्लॅट नं. १०३ ता. जि. नागपुर यांचे घरी कोणी हजर नसतांना यातील अज्ञात आरोपीने त्यांचे अपार्टमेंट मधील घरांचे दारांचे कुलुप तोडून आत प्रवेश करून फिर्यादीचे बेडरूम मधील आलमारीतील १) सोन्याची चैन ८ ग्रॅम किंमती २०,०००/– रू. २) सोन्याची अंगठी ३ ग्रॅम किंमती ७५००/– रू. ३. एक टायटन मनगटी घड्याळ किंमती अंदाजे १५००/– रू. व गुल्लक मध्ये ठेवलेले नगदी ५०००/– रू. तसेच अनिल वंजारी यांचे फ्लॅट मधुन नगदी ५०००/– रू. असा एकुण ३९,०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक भोयर मो. क्र. ९९२३१११२७० या करीत आहे.

## जबरी संभोग

पो.स्टे. नरखेड :– दिनांक ०१/०२/२०२२ चे १६.०० वा. ते दिनांक ३०/०५/२०२२ चे १८.०० वा. दरम्यान यातील आरोपी नामे– उमेश भुक्ते, रा. नरखेड याने अविवाहीत पिडीता हिला नौकरीचे आमिष दाखवून पिडीतेसोबत वारंवार संभोग करून हातानी मारहाण केली. त्याबाबत कोणालाही काही सांगितल्यास जिवाने मारण्याची धमकी दिली. तसेच पिडीता ही आरोपी कडुन गरोदर राहुन एका मुलीस जन्म दिला आहे. पिडीता ही बाळाचे संगोपण करण्यास असमर्थ असल्याकारणाने तीने हेल्पलाईन क्र १०९८ वर कॉल करून बाल कल्याण समिती अमरावती यांचे सोबत संपर्क करून बाळ त्यांचे ताब्यात दिले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम ३७६ (२) (ह), ३७६ (२) (एन), ३२३, ५०४ भादवि कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. हरीचंद्र गावडे मो. नं. ८४२४०४३१३५ या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर